Circular Marathi

# मुंबई विद्यापीठ

क्र.मा.सं.वि.क/आयसीसी/२०२३-२४/११४

**संदर्भ- क्र. मा. सं. वि. क/आयसीसी/२०२३-२४/०१,**
**दिनांक २५ एप्रिल, २०२३**

विद्यापीठातील सर्व विभागांचे संचालक/ विभाग प्रमुख, सर ज. जी. वास्तुशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य, मुंबई विद्यापीठ ग्रंथालयाचे ग्रंथपाल, प्रभारी संचालक, परिक्षा व मुल्यमापन मंडळ, प्रभारी वित्त व लेखा अधिकारी, समन्वयक, रत्नागिरी उपपरिसर, समन्वयक, ठाणे उपपरिसर, समन्वयक, स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड अप्लाईड सायन्सेस, कल्याण उपकेंद्र, सर्व उपकुलसचिव, स्था. नियंत्रक, मुद्रण व लेखन सामुग्री, प्रभारी विद्यापीठ अभियंता, सर्व सहायक कुलसचिव आणि कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागांचे/कक्षांचे प्रमुख यांना उपरोक्त संदर्भिय परिपत्रकाव्दारे स्थायी कर्मचाऱ्यांच्या उपस्थिती अहवालासोबत त्यांच्या अनुपस्थितीच्या कालावधीचे ई-समर्थ प्रणालीद्वारे अग्रेषित केलेले रजेचे अर्ज पुढील महिन्याच्या पाच तारखेच्या आत मानव संसाधन विकास कक्ष-३, फोर्ट, मुंबई -४०० ०३२ या विभागात सादर करण्याबाबत अवगत करण्यात आले होते.

तरी या परिपत्रकाव्दारे विद्यापीठातील सर्व विभागप्रमुख यांना कळविण्यात येते की, अद्यापही काही विभागातील कर्मचाऱ्यांचे अनुपस्थितीच्या कालावधीचे ई-समर्थ प्रणालीद्वारे अग्रेषित केलेले रजेचे अर्ज महिन्याच्या पाच तारखेच्या आत कर्मचाऱ्यांच्या उपस्थिती अहवालासोबत मानव संसाधन विकास कक्ष या विभागास प्राप्त होत नसल्याचे निर्दशनास आले आहे. तरी सर्व विभागप्रमुखांना सूचित करण्यात येते की, आपल्या अधिनस्त असलेल्या स्थायी कर्मचाऱ्यांचा उपस्थिती अहवाल वेतन कक्ष, वित्त व लेखा विभाग, फोर्ट, मुंबई -४०० ०३२ तसेच उपस्थिती अहवालासोबत कर्मचाऱ्यांच्या अनुपस्थितीच्या कालावधीचे ई-समर्थ प्रणालीद्वारे अग्रेषित केलेले रजेचे अर्ज मानव संसाधन विकास कक्ष, फोर्ट, मुंबई -४०० ०३२ या विभागास पुढील महिन्याच्या पाच तारखेपर्यंत सादर करण्यात यावेत. ज्या कर्मचाऱ्यांचा उपस्थिती अहवाल वेतन कक्ष, वित्त व लेखा विभाग, फोर्ट, मुंबई -४०० ०३२ तसेच उपस्थिती अहवाल व अनुपस्थिती कालावधीचे ई-समर्थ प्रणालीद्वारे अग्रेषित केलेले रजेचे अर्ज मानव संसाधन विकास कक्ष, फोर्ट, मुंबई -४०० ०३२ या विभागास महिन्याच्या पाच तारखेपर्यंत सादर करण्यात येणार नाही त्यांची रजा विनावेतनी करण्यात येईल व त्याची जबाबदारी विभागप्रमुख व संबंधित कर्मचाऱ्यांची राहील.

सदर बाब सर्व संबंधित कार्यालय प्रमुख यांनी आपल्या अधिनस्त अधिकारी /कर्मचाऱ्यांना निर्दर्शनास आणून द्यावी.

(प्रा.सुनिल भिरुड)
प्रभारी कुलसचिव
मुंबई विद्यापीठ

२० डिसेंबर, २०२३
मुंबई - ४०००३२

...२/-

प्रति,
विद्यापीठातील सर्व विभागांचे संचालक/विभाग प्रमुख,
सर ज. जी. वास्तुशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य,
विद्यापीठ ग्रंथालयाचे ग्रंथपाल,
प्रभारी संचालक, परिक्षा व मुल्यमापन मंडळ, वित्त व लेखा अधिकारी,
संचालक, रत्नागिरी उपपरिसर,
संचालक, ठाणे उपपरिसर,
संचालक, सिंधुदुर्ग उपपरिसर,
सर्व उपकुलसचिव, स्थानापन्न नियंत्रक, मुद्रण व लेखन सामुग्री,
विद्यापीठ अभियंता, सर्व सहायक कुलसचिव आणि कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागांचे कक्षांचे प्रमुख

(ए) प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित -

१. विद्यापीठाशी संलग्नित/संचालित/स्वायत्त महाविद्यालयांचे प्राचार्य.
२. विद्यापीठातील सर्व उपकुलसचिव,
३. उपकुलसचिव/मुख्य लेखापाल (वित्त व लेखा विभाग)
४. स्थानापन्न नियंत्रक, मुद्रण व लेखन सामुग्री, विद्यापीठ मुद्रणालय.
५. विद्यापीठ अभियंते (फोर्ट परिसर , विद्यानगरी परिसर, रत्नागिरी, ठाणे व सिंधुदुर्ग उपपरिसर)
६. सर्व सहायक कुलसचिव/सहायक कुलसचिव (वित्त व लेखा)
७. सुरक्षा अधिकारी, तसेच सर्व सहायक सुरक्षा अधिकारी.
८. कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागांचे/कक्षांचे प्रमुख.
९. उद्यान अधिक्षक/अधिक्षक (तांत्रिक) , विधी विभाग
१०. स्वीय सहायक (१) कुलगुरु (२) प्र-कुलगुरु(३) प्रभारी कुलसचिव (४) प्रभारी वित्त व लेखा अधिकारी (५) प्रभारी संचालक, परिक्षा व मुल्यमापन मंडळ

(ब) प्रत माहितीसाठी अग्रेषित -

१. सचिव, उ.मा.सा.
२. सचिव, मुंबई युनिवर्सिटी ऑफिसर्स व वेल्फेअर असोसिएशन (मुनोवा)
३. सरचिटणीस, मुंबई विद्यापीठ कर्मचारी संघ.
४. सरचिटणीस, शैक्षणिक कर्मचारी कल्याणकारी संघटना.
५. सरचिटणीस, मुंबई विद्यापीठ मागासवर्गीय कर्मचारी संघटना.
६. सचिव, ऑल इंडिया आदिवासी एम्पलॉइज फेडरेशन शाखा मुंबई विद्यापीठ.
७. सचिव, मुंबई विद्यापीठ कर्मचारी सहकारी पतपेढी मर्या.

(प्रा.सुनिल भिरुड)
प्रभारी कुलसचिव
मुंबई विद्यापीठ